# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे-२०१७/५९/१८७०५
दूरध्वनी: ०२२-२६६७७५५५
फॅक्स : ०२२-२६६६०२८७
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : ०८ ऑक्टोबर,२०१७.

**<u>: कार्यालयीन आदेश :</u>**

"महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६" आणि "महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम,२००९" राज्यात स्थानिक प्राधिकरण व नियोजन प्राधिकरण क्षेत्रात अनुक्रमे दि.०६.१२.२००८ व दि.२३.०६.२००९ रोजी अंमलात आलेले आहेत. सदर अधिनियम व नियमांची अंमलबजावणी करताना नागरीकांना तसेच अग्निशमन विभागांना काही अडचणी येत आहेत. त्यासाठी सदर अधिनियम व नियमांमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यासाठी विविध महानगरपालिका/नगरपरिषदां तसेच विविध संस्थांकडून तसेच नागरीकांकडून सुधारणा करण्याबाबत मागणी होत आहे. त्याअनुषंगाने "महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६" आणि "महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम,२००९" यांचे सुधारित प्रारुप तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे अभ्यासगट गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. श्री.ए.पी.मांडके, मुख्य अग्निशमन अधिकारी, सिडको अग्निशमन सेवा | : अध्यक्ष |
| २. श्री.एम.व्ही.ओगले, उपमुख्य अग्निशमन अधिकारी, एमआयडीसी अग्निशमन सेवा | : सदस्य |
| ३. श्री.डी.एम.पालव, उपमुख्य अग्निशमन अधिकारी, वसई-विरार शहर महानगरपालिका | : सदस्य |
| ४. श्री.ए.व्ही.परब, विभागीय अग्निशमन अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका | : सदस्य |
| ५. श्री.के.आर.हत्याळ, वरिष्ठ प्रशिक्षक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय | : सदस्य |

१. वरील अभ्यास गटाने आवश्यकतेनुसार बैठका आयोजीत करुन "महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६" आणि "महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम,२००९" ची छाननी करुन त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन सुधारीत अधिनियम व नियमाचे प्रारुप या संचालनालयास दि.३१ ऑक्टोबर,२०१७ पर्यंत सादर करावा.
२. अभ्यासगटाकडून प्राप्त झालेले अधिनियम व नियमाचे सुधारीत प्रारुप मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात येईल.
३. शासनाकडून या सुधारीत प्रारुपाचा अभ्यास करण्यासाठी विविध अग्निशमन सेवा प्रमुखांची उपसमिती गठीत करण्यात येईल.
४. अभ्यासगटाच्या सदस्यांना प्रवास व दैनिक भत्त्यावरील खर्च त्यांच्या संबंधीत आस्थापना करतील.
५. वरील अधिका-यांचे आस्थापना प्रमुख वरील अधिका-यांच्या सेवा आवश्यक त्यावेळी उपलब्ध करुन देतील.

(प्र.सु.रहांगदळे)
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रति,

१. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, अंधेरी-पूर्व, मुंबई.

३. आयुक्त, बृहमुंबई महानगरपलिका, महापालिका मुख्यालय, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई.
४. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपलिका, विरार, जिल्हा-पालघर.
५. श्री.ए.पी.मांडके, मुख्य अग्निशमन अधिकारी, सिडको अग्निशमन सेवा.
६. श्री.एम.व्ही.ओगले, उपमुख्य अग्निशमन अधिकारी, एमआयडीसी अग्निशमन सेवा
७. श्री.डी.एम.पालव, उपमुख्य अग्निशमन अधिकारी, वसई-विरार शहर महानगरपालिका.
८. श्री.ए.व्ही.परब, विभागीय अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल, मुंबई.
९. श्री.के.आर.हत्याळ, वरिष्ठ प्रशिक्षक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई.